# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर



## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ जीवन गौरव पुरस्कार : आदर्श नियम

१. कला, संस्कृती, साहित्य, शास्त्र, क्रीडा, शिक्षण व संशोधन, सामाजिक, राजकीय, कृषी, उद्योग व व्यापार आदी क्षेत्रांपैकी एखाद्या क्षेत्रामध्ये जीवनभर विशेष उल्लेखनीय योगदान (Outstanding/Extraordinary contribution) देणाऱ्या व्यक्तीस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ जीवनगौरव पुरस्कार विद्यापीठ वर्धापन दिनी देऊन सन्मानित करण्यात येईल.

२. पुरस्कारासाठी निवड करण्यात येणाऱ्या/नामनिर्देशित करण्यात येणाऱ्या हयात व्यक्तीचे किमान वय ६० वर्षापेक्षा कमी नसावे.

३. **पुरस्काराचे स्वरुप** (Nature of Award) : रोख रक्कम रु. ५१,०००/- (रुपये एकावन्न हजार फक्त) सन्मानपत्र व गौरवचिन्ह असे राहील.

४. **नामनिर्देशन पध्दत :** सदरील पुरस्कारासाठी पुरस्कारर्थीची निवड करण्यासाठी मा. कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली शोध समिती गठीत करण्यात येईल. सदरील समितीची संरचना खालीलप्रमाणे असेल :

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ जीवनगौरव पुरस्कार शोध समिती**

| | |
|---|---|
| मा. कुलगुरु | अध्यक्ष |
| मा. प्र-कुलगुरु | सदस्य |
| मा. कुलसचिव | सदस्य |
| मा. व्यवस्थापन परिषद सदस्य ( संस्थाचालक) | सदस्य |
| मा. व्यवस्थापन परिषद सदस्य ( प्राध्यापक ) | सदस्य |
| मा. व्यवस्थापन परिषद सदस्य (पदवीधर) | सदस्य |
| मा. व्यवस्थापन परिषद सदस्य (अधिष्ठाता / प्राचार्य) | सदस्य |

उपरोक्तप्रमाणे समिती जीवन गौरव पुरस्कारासाठी एका व्यक्तीची निवड करुन तशी शिफारस व्यवस्थापन परिषदेकडे करेल. तथापि, शोध समितीस योग्य व्यक्ती न आढळल्यास समिती त्या वर्षी जीवनगौरव पुरस्कारसाठी निरंक अशी शिफारस करेल.

**५. नामनिर्देशन करण्याचे मुद्दे :**

१. सदर पुरस्कारासाठी निवड करण्यात येणाऱ्या व्यक्तीची जनमानसात स्वच्छ प्रतिमा असावी आणि त्यांचे नैतिक अधिष्ठान व कार्य इतरांना मार्गदर्शक ठरावे. ती व्यक्ती निर्व्यसनी व निष्कलंक असावी आणि त्यांच्याविरुध्द कसल्याही प्रकारच्या फौजदारी स्वरुपाच्या गुन्हयाची नोंद नसावी.

२. ज्या क्षेत्रात कार्य केलेले आहे ते कार्य नाविन्यपूर्ण समाजोन्नतीचे असावे.

३. कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य

४. साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य

५. पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य

६. शिक्षण व संशोधन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य

७. क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य

८. सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य

९. राजकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य

१०. इतर क्षेत्र : कला व सांस्कृतिक, उद्योग व व्यापार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य

**६. तांत्रिक अटी :**

१. पुरस्कार विभागून दिला जाणार नाही.

२. पुरस्कारासाठी राज्यस्तरापर्यंतची व्याप्ती असेल. तथापि, संबंधित व्यक्तीची नाळ सोलापूर जिल्ह्याशी निगडीत असेल अशा ख्यातनाम व्यक्तीचा अग्रक्रमाने विचार करावा.

३. पुरस्कारासाठी पात्र व्यक्ती आढळून न आल्यास पुरस्कार त्यावर्षी घोषित केला जाणार नाही.

४. सदर पुरस्कार मरणोत्तर जाहिर करण्यात येणार नाही.

**८. इतर माहिती:**

१. जीवनगौरव पुरस्काराच्या निवडीसाठी शोध समिती त्या-त्या क्षेत्रात वर निर्देशित समकक्ष पातळीवर कसोट्या लावून पुरस्कारासाठी एका व्यक्तीची अंतिम निवड करेल. समितीचा निर्णय अंतिम असेल.